# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28 / 10 / 2022 (शुक्रवार)

---

### जबरी संभोग

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत दिनांक ०२/०९/२२ पासुन पिडीत फिर्यादीस आरोपी शिवा उर्फ राहुल किसन चौधरी वय २५ वर्ष, रा. आष्टी, जिल्हा–वर्धा ह.मु. डोरली, ता.काटोल, जिल्हा–नागपुर ने खोटे आमीष दाखवुन तीला आपले मोटर सायकलने ब्राम्हणवाडा गोविंदपुर, जिल्हा–अमरावती या गावी भोंगाडे यांचे वाड्यात वेगळ्या खोलीत ठेवुन चाकुचा धाक दाखवुन पिडीत फिर्यादीस मी तुझेवर प्रेम करतो, तुला अशीच सोडणार नाही, असे म्हणुन पिडीताचे इच्छेविरूद्ध जबरदस्तीने वारंवार शारीरीक सबंध ठेवुन रूमचे बाहेरून दार लावुन पिडीतास आतमध्ये १५ दिवस कोंडुन ठेवले व याबाबत कोणालाही सांगीतले तर मारून टाकण्याची धमकी दिली. सदर प्रकरणी आरोपीविरुध्द पो.स्टे कळमेश्वर येथे गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/प्रियंका गेडाम, पोलीस स्टेशन कळमेश्वर मो.नं. ९५०३९७३६५७ हे करीत आहे.

### घरफोडी

**२) पो.स्टे. एम आय डी सी बोरी** :– अंतर्गत दिनांक २५/१०/२२ चे १८/३० वा. ते २७/१०/२२ चे १०/०० वा दरम्यान काही अज्ञात चोरटयाने एमआडीसी बोरी येथील आरसन्स एन्डस मोटर रिवायडींग वर्कस, कंपनीचे मागील शटर वाकवून व तोडुन वर उचलुन कंपनीतील १) १० जुन्या मोटारी २) ४० किलो तांब्याचा तार ३) सीसीटीवी च्या डी.बी.आर. असा एकुण ४५,००० रू. चा माल चोरी गेल्याबाबत कंपनीचे सुपरवायजर फिर्यादी श्री रमेश गंगाप्रसाद अलघरे वय ५० रा. इंडोरामा कॉलनी, एमआडीसी बोरी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात ईसमावर पोलीस स्टेशन एमआडीसी बोरी येथे गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/११५२ किशोर डेकाटे, पोलीस स्टेशन एमआडीसी बोरी मो.नं. ७४९८०२०३९९ हे करीत आहे.

### गंभीर दुखापत

**३) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत दिनांक २६/१०/२०२२ फिर्यादी श्री संतोष रामविलास ठाकुर वय ३६ वर्ष रा. खदान नं. ०३ हवामहल कन्हान हा आपले उधारीचे पैसे आपल्या मित्र तेजप्रकाश याला मागण्या करीता लोकेश गुप्ता यांच्या दुकाणावर गेला असता तो तिथे दिसला नाही म्हणुन तिथे उभे असलेले आरोपी १) सोहेल खान वय २५ वर्ष, २) रोहित दोन्ही रा. कन्हान यांना विचारले की येथे दुकाणावर काम करणारा तेजप्रकाश नाही दिसत आहे तो कोठे बाहेर गेलेला आहे काय? असे विचारले असता आरापीतांनी हम लोग इसी काम के लिये यहा खडे है क्या असे म्हणुन फिर्यादीस दोन थापडा मारुन शिवीगाळ करुन फिर्यादीच्या कमरेवर धारधार शस्त्राने मारुन जखमी करुन दुखापत पोहचविली. सदर प्रकरणी आरोपीविरुध्द पो.स्टे कन्हान येथे गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पो. हवा. खुशाल रामटेके ब.नं. २९८ पो.स्टे. कन्हान मो.नं. ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

## पळवुन नेणे

**४) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत दिनांक २५/१०/२०२२ रोजी फिर्यादी श्री मिथुन तेजरामजी उइके वय ३१ वर्ष रा मोहाडी ता मौदा जि नागपुर हे त्यांचे मुळ गावि रेंगेपार येथे मंडई पाहन्याकरीता गेलो व दि २६.१०.२२ रोजी सायंकाळी ०६.०० वा परत आले असता त्यांचे सोबतच राहणारी त्यांची पुतणी कु. दिव्या राजकुमार उइके वय १५ वर्ष हि घरी दिसुन आली नाही फियादीने आईला दिव्याबाबत विचारणा केली तर तिने सकाळी ०७.०० वा शेतात गेली असता दिव्या ही घरीच होती व आजुबाजुला विचारले असता दिव्या ही ०२.०० वा पर्यंत घरीच होती असे सांगीतले तिचा आजुबाजुला नातेवाइकांकडे सर्वत्र शोध घेण्यात आला, परंतु मिळून न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन किंवा पैश्याचे आमीष दाखवुन पळवुन नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा बेले ब.न. २१९ मो.न. ९८६००४९७८२ हे करीत आहे.

**५) पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत दिनांक २७/१०/२०२२ रोजी फिर्यादि सौ. सुनंदा रामकृष्ण कळंबे वय ४० वर्ष रा. वार्ड क्र.२ जलालखेडा हिची अल्पवयीन मुलगी नामे कु. दिपाली रामकृष्ण कळंबे वय १७ वर्ष २ महीने रा. वार्ड क्र. ०२ जलालखेडा ही घरी कोणलाही न सागंता घरुन निघुन गेल्याने तिचा आजुबाजुला नातेवाइकांकडे सर्वत्र शोध घेण्यात आला, परंतु मिळून न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन किंवा पैश्याचे आमीष दाखवुन पळवुन नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील पोउपनी मनोज शेंडे पो.स्टे. जलालखेडा मो.नं. ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**६) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत दि. २७.१०.२२ रोजी रात्री २०/४४ वा सुमारास यातील मृतक कु. अभिलाषा राकेश भोस्कर वय २० रा क्वार्टर क्र ७२/०५ चनकापुर हीं आपल्या घरी एकटी असताना बेडरूमच्या बाजुला असलेल्या गेटवरती लोखडी ऍगल वरती काळया ओढणी ने बाधुन गळफास घेवुन आत्महत्या केल्याने सदर प्रकरणी पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ चंद्रभान जळते ब न १३५ पोस्टे खापरखेडा मो क्र. ९१५६४९४५६५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**